क्रमांक : ७६३८/४ कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० एप्रिल, २०२६.

**प्रेषक :-**

सचिव-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

**विधानसभेचे सर्व सन्मा. सदस्य**

**विषय: <u>मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्विकारण्याबाबत</u>**

**महोदय/महोदया,**

निदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेच्या **सोमवार, दिनांक २२ जून, २०२६** रोजीपासून सुरु होणाऱ्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरिता गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमूद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग-दोनद्वारे सर्व मा.सदस्यांना **गुरुवार, दिनांक ३० एप्रिल, २०२६** रोजी **ई-मेलद्वारे** पाठविण्यात आला असून या सचिवालयाच्या **www.mls.org.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात आला आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

**सदरहू अधिवेशनासाठी तारांकित प्रश्न सूचना शुक्रवार, दिनांक १५ मे, २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. पासून QIS या संगणक प्रणालीवर <u>ऑनलाईन</u> (Online) पध्दतीने स्विकारण्यात येतील. मा.सदस्यांना प्रश्न सूचना स्विकारण्याच्या प्रथम दिनांकापासून चक्रानुक्रमात नमूद केलेल्या विवक्षित उत्तराच्या दिनांकाकरिता प्रश्न सूचना स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्रश्न सूचना या सचिवालयाकडे ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.**

कृपया याची नोंद घ्यावी.

आपली

**( सीमा तांबे )**
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**<u>याची प्रत माहितीसाठी :-</u>**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये, विधान भवन, मुंबई ४०० ०३२.**